**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १/२०१८**

अजिम शेख शब्बीर मन्यार वि. मृत्यू नोंदणी निबंधक कासोदा

## जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम अंतर्गत न्यायीक चौकशी अंती अंतिम आदेश

अर्जदार अजिम शेख शब्बीर मन्यार यांनी प्रस्तुत अर्ज त्यांच्या आजीच्या मृत्यू नोंदणी आदेशाकरिता दाखल केला आहे. अर्जदाराच्या कथनानुसार त्यांची आजी नामे अरस्तुलबी शेख बिसमिल्ला मन्यार यांचा मृत्यू दिनांक ०१/०६/२०१५ रोजी कासोदा येथे झालेला आहे. अर्जदारास मयत अरस्तुलबी शेख बिसमिल्ला मन्यार यांच्या घर मिळकतीला वारस लावणेकरिता मृत्यू दाखल्याची आवश्यकता आहे. अर्जदार यांनी मृत्यू नोंदणी निबंधक, कासोदा यांच्याकडे अरस्तुलबी शेख बिसमिल्ला मन्यार यांचा मृत्यू दाखला मिळणेसाठी दिनांक १६/०९/२०१७ रोजी अर्ज केला असता त्यांच्या मृत्यूची नोंद आढळून येत नसल्याबाबत त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मृत्यू नोंदवहीची तपासणी करुन जा.क्र. ग्रा.पं./आरआर/१/२०१७ अन्वये दाखला दिला आहे. सबब, अर्ज मंजूर करुन अरस्तुलबी शेख बिसमिल्ला मन्यार यांचा मृत्यू दिनांक ०१/०६/२०१५ रोजी झाल्याबाबत मृत्यूतारीख नोंदणीबाबत आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास अनुषंगून ''दैनिक नजरकैद'' या स्थानिक वृत्तपत्रामध्ये नोटीस (नि.क्र.१२) प्रसिध्द करुन सार्वजनिकरित्या हरकत मागवण्यात आली. तसेच मृत्यूनोंदणी निबंधक, कासोदा यांचे म्हणणे मागविण्यात आले. मात्र अर्जदाराच्या अर्जास न्यायालयात हजर होवून कुणीही हरकत घेतली नाही. तसेच मृत्यूनोंदणी निबंधक, कासोदा यांनी हजर होवून त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे सामनेवाल्यांच्या म्हणण्याशिवाय अर्ज पुढे चालविण्याचा आदेश पारित करण्याला.

३. अर्जदाराने अर्जाच्या पुष्टयर्थ शपथपत्र (नि.क्र.१०) सादर करुन अर्जातील कथनांचा पुनश्च उच्चार केला. तसेच (नि.क्र.३) सोबत अर्जदाराच्या आधार कार्डची छायांकित प्रत दाखल केली.

४. एकंदरीत, अर्जदारांचे कथन व तोंडी तसेच कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करता स्पष्ट होते की, अरस्तुलबी शेख बिसमिल्ला मन्यार यांचा मृत्यू दिनांक ०१/०६/२०१५ रोजी कासोदा येथे झाल्याचे अर्जदारांचे कथन सकृतदर्शनी खरे आहे. सबब, अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. याद्वारे मृत्यूनोंदणी निबंधक, कासोदा यांना निर्देशित करण्यात येते की, अरस्तुलबी शेख बिसमिल्ला मन्यार यांच्या दिनांक ०१/०६/२०१५ या मृत्यूतारखेची नोंद मृत्यूनोंदणी अभिलेखावर घेण्यात यावी.

दिनांक २३/०२/२०१८

(नितेश म. बंडगर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, एरंडोल.